३) तोंडातील लाल आणि पांढरा चट्टा किंवा व्रण
Erythroleukoplakia (Red & White mixed patch)




४) गालाच्या स्नायूंची लवचिकता कमी होणे/तोंड कमी उघडणे
Oral Submucous Fibrosis (OSMF)




मुख कर्करोग - सुरूवातीची अवस्था (Oral Cancer-Early Stage)




मुख कर्करोग - प्रगत अवस्था (Oral Cancer-Advance Stage)





### तंबाखू व दारू सेवनाचे दुष्परिणाम

| **तोंडातील परिणाम** (Local Oral Effects) | **संपूर्ण शरीरावर परिणाम** (General Body Effects) |
|---|---|
| तोंडातील लाल / पांढरे चट्टे / व्रण | हृदय विकार |
| मुखकर्करोग | उच्च रक्तदाब |
| मुख दुर्गंधी | फुफ्फुसाचे आजार (दमा, ॲलर्जी) |
| दातांवर डाग | फुफ्फुसाचा कर्करोग |
| आवाजात बदल | जनन इंद्रियांचे आजार |
| जेवतांना व अन्न गिळतांना त्रास | डोळ्यांचे विकार (उदा. मोतीबिंदू) |
| | घसा, स्वरयंत्र, अन्ननलिका, उदर तसेच यकृताचा कर्करोग |
| | मानसिक आरोग्यावर परिणाम |

# The 8-Step Oral Cancer Screening




### मुखपूर्व कर्करोग आणि मुख कर्करोग निदानासाठी तोंडाची तपासणी (Oral Cancer / Pre-Cancer Screening)

मुख कर्करोग आणि त्याच्या प्राथमिक लक्षणांसाठी योग्य पध्दतीने (चित्रात दर्शविल्याप्रमाणे) संपूर्ण मौखिक तपासणी केल्यास लवकर निदान होवून त्वरीत उपचार शक्य आहेत. आपण रूग्णांस स्वत:च्या तोंडाची तपासणी स्वतं:च करायला खालीलपध्दतीने शिकवू शकतात. (Oral Self Examination)

- व्यवस्थित चूळ भरून प्रकाश तोंडावर येईल अश्या पध्दतीने आरशासमोर उभे राहवे
- वर नमूद केलेल्या लक्षणांची तपासणी हातांच्या दोन्ही बोटांचा वापर करून गालाचा व ओंठाचा आतील भाग, संपूर्ण जीभ, टाळू, हिरड्या, जिभेखालचा भाग, तोंडातील घश्याकडचा भाग या सर्व भागांची व्यवस्थित तपासणी करून पाहावे.
- वरीलप्रमाणे आपण तोंडातील प्रत्येक भाग व्यवस्थित तपासून काही अनियमितता असल्यास नोंद करून त्या व्यक्तीच्या निदर्शनास आणून त्याला दंतवैद्याला भेटण्याचा सल्ला दयावा. तसेच त्याला तंबाखूजन्य सवयी व दारूच्या व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी समुपदेशन करावे.



**आरोग्यपूर्ण आहार घ्या, चांगल्या सवयींचे पालन करा आणि निरोगी आणि आंनदी रहा कारण आपले निरोगी मुख आपल्या संपूर्ण शरीराचा निरोगी 'आरसा' आहे.**

# मुखपूर्वकर्करोग आणि मुखकर्करोग
# (Oral Pre-Cancer & Oral Cancer)

## माहिती पुस्तिका

**डॉ. क्षिप्रा देशपांडे**
(मुखकर्करोगतज्ञ)
बी.डी.एस. एम.डी.एस, पीएचडी. संशोधक
स. प्राध्यापक
डॉ. हेगडेवार स्मृती रुग्ण सेवा मंडळ यांचे दंत महाविद्यालय, हिंगोली

**डॉ. सुचित्रा गोसावी**
(मुखकर्करोगतज्ञ)
बी.डी.एस., एम.डी.एस, पीएचडी मार्गदर्शक
प्राध्यापक, आणि विभाग प्रमुख
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

### अनुक्रमणिका:

- मौखिकरचना-दात, जबडा अणि तोंडातील इतर भाग
- तंबाखू आणि तंबाखूजन्य मौखिक सवयी
- प्रमुखत: तोंडातील तंबाखू ठेवण्याच्या जागा
- प्रामुख्याने आढळणारी मुख कर्करोगाची प्राथिमिक(Precancerous) लक्षणे
- सामान्यत: तोंडातील 'हया' भागात मुख कर्करोग किंवा प्राथमिक लक्षणांची वाढ होते
- तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांचे तोंडात तसेच संपूर्ण शरीरावर होणारे घातक परिणाम
- मुखपूर्व कर्करोग आणि मुख कर्करोग निदानासाठी तोंडाची तपासणी
- मौखिक आरोग्य आणि अनारोग्य यांतील स्थिती ओळखणे
- नियमित दंत वैद्याना भेटणे व दंत चिकित्सेचे महत्त्व जाणणे (Importance of regular dental check – up)

## Normal oral cavity anatomy; showing all soft tissue areas of the oral cavity

मौखिकरचना–दात, जबडा अणि तोंडातील इतर भाग




**आपले मौखिक आरोग्य निरोगी राखणे ही आपली जबाबदारी आहे,**

**"Healthy Mouth is the Mirror of Heathy Body"**

अर्थातच "निरोगी मुख हे तुमच्या निरोगी शरीराचे प्रतिबिंब आहे."

## तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थ

प्रमुखत: दोन प्रकारात मोडतात

- धुम्रपान (उदा. बिडी, सिगारेट, हुक्का, इत्यादी)
- तंबाखूसेवन (गुटखा, खर्रा, पान मसाला मिश्री इत्यादी)

### विविध तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ




### तंबाखू किंवा तंबाखूजन्य पदार्थ तोंडांमध्ये ठेवण्याच्या विशिष्ठ जागा

खालच्या जबडयात

१. समोरील दात व ओठांचा मधला भाग (Lower Labial Vestibule)



२. गाल व हिरडयांच्या मधला भाग (Lower Buccal Vestibule)



३. जीभेचा खालचा भाग (Floor of Mouth)



वरच्या जबडयात

१. समोरील दात व ओठांचा मधला भाग (Upper Labial Vestibule)



२. गाल व हिरडयांच्या मधला भाग (Upper Buccal Vestibule)



## मुखपूर्व कर्करोग आणि मुख कर्करोगांचे निदान

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन तसेच दारूचे व्यसन असणाऱ्या लोकांमध्ये मुखकर्करोगांचे प्रमाण ७०% अधिक असते.

मुखकर्करोगाच्या काही प्राथमिक अवस्था (Precancer stages) असतात. जर ह्या प्राथमिक अवस्थेतच रोगाचे निदान झाले आणि योग्य उपचार जर त्या व्यक्तिस मिळाले तर आपण त्याला मुखकर्करोग होण्यापासून वाचवू शकतो.

### तीन प्रकारचे प्राथमिक निदान.

**Step 1** : कर्करोगाच्या लक्षणांबद्दल जागरूकता आणि काळजी घेणे

**Step 2** : क्लिनिकल मूल्यांकन, निदान आणि स्टेजिंग

**Step 3** : वेदना कमी करण्यासह उपचारांमध्ये प्रवेश

### तोंडाचा कर्करोग आणि पूर्व कर्करोगाची सामान्य चिन्हे आणि लक्षणे

**खालीलपैकी कुठलीही लक्षणे आढळल्यास आपण त्या व्यक्तीस दंतवैद्याकडे पुढील तपासणी व योग्य उपचारासाठी पाठवू शकता.**

- तोंडातील पांढरा किंवा लाल चट्टा (White/ Red patch in the oral cavity)
- तीन आठवडयापेक्षा अधिक काळापासूनची तोंडातील भरून न येणारी जखम / व्रण (Ulceration/roughened areas in the oral cavity, especially those that does not heal for more than three weeks)
- तोंडातील आवरणाचा पांढरेपणा (Whiteness of the lining of the oral cavity)
- गरम किंवा मसालेदार पदार्थ सेवनानंतर होणारा तोंडाचा दाह (Difficulty in tolerating spicy foods)
- तोंडाच्या स्नायूंची लवचिकता कमी होणे / तोंड कमी उघडणे (Difficulty in opening the mouth)
- जिभेच्या स्नायूंची लवचिकता कमी होणे (Difficulty in protruding the tongue)
- आवाजात बदल (Change in voice)
- लाळीचे वाढलेलेप्रमाण (Excessive salivation)
- अन्न चावताना / गिळताना / तसेच बोलतांना त्रास होणे (Difficulty in chewing/ swallowing/ speaking)

### Following are the few clinical photographs of Oral Cancer and Precancer

मुखपूर्व कर्करोग आणि मुख कर्करोगांची काही छायाचित्रे :

१) तोंडातील पांढरा चट्टा किंवा व्रण Leukoplakia (White patch)



२) तोंडातील लाल चट्टा किंवा व्रण Erythroplakia (Red patch)

